# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९९ - २३** **दिनांक : - ०३/०९/२०२३**

## आरोपींकडुन एक विदेशी पिस्तुल, ४ जिवंत काडतुसे आणि १ गोळीबारा पश्चात उरलेली रिकामी पुंगळी जप्त करण्यात वालीव पोलीसांना यश

वालीव पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे यांना दिनांक ०३/०९/२०२३ रोजी रात्री १२:०० वाजताच्या सुमारास खैरपाडा, वसई परीसरात एक इसम अग्नीशस्त्र खरेदी-व्रिकी करिता येणार असल्याची गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली होती. सदर माहीतीच्या सत्यतेबाबत शहानिशा करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्याबाबत मा. प्रभारी अधिकारी, वालीव पोलीस ठाणे यांनी वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप व पथकास आदेश दिले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बामतीदाराच्या मदतीने आरोपी नामे रमेशकुमार सत्यप्रकाश यादव, वय २५ वर्षे, धंदा- मजुरी, रा. मुळगाव- रुकुनपुर, पोस्ट- बेलगहन, थाना- सिकरारा, तहसिल- मढीयाहु, जि. जोनपुर, राज्य- उत्तरप्रदेश यास सापळा रचुन शिताफीने ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक विदेशी पिस्तुल मॅगझीनसह, ४ जिवंत काडतुसे आणि १ गोळीबारा पश्चात उरलेली रिकामी पुंगळी असा एकुण रु. ५४ हजार ५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा विनापरवाना अग्निशस्त्र जवळ बाळगताना मिळुन आला व मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे कडील मनाई आदेशाचा भंग केला म्हणुन आरोपी विरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७३२/२०२३ कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७(१)(३),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कामगीरी श्रीमती पोंणिमा श्रींगी – चौगुले, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयरात रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सैय्यद जिलानी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.ह. मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, सुनिल चव्हाण, बाळु कुटे, पो.शि. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या केली आहे.

**----0000----**